

## देवदैठण येथील केंद्र शाळेची दुर्दशा ?

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंद्र असलेल्या शाळेची पूर्ण दुरावस्था झाली असून त्या ठिकाणी उंदीर घुशींची शाळा भरत आहे.संपूर्ण शाळा उंदीर घुशींनी पोखरून टाकली आसुन बिळे तयार होऊन त्यामध्ये साप निघत आहे शाळेतील फरशी निघली आसुन पत्रे पावसाने गळत आहे. शाळेच्या या अवस्थेमध्ये पालकांनी मुलांना शाळेत कसे पाठवायचे असे पालकांसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या शाळेला १९७० साली ६ खोल्या व १९८५ साली ५ वर्ग खोल्यांची उभारणी झालेली आहे.एकूण ११ वर्ग खोल्या असून सर्व खोल्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेले आहे.ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन कमिटी यांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे अनेक वेळा मागणी करूनही खोल्या मंजूर होत नाही.नवीन खोल्यांना मंजुरी येत नसल्यामुळे आहे-त्या खोल्यांचे निर्लेखन करता येत नाही त्यामुळे गावातील ग्रामस्थ सरपंच जयश्रीताई गुंजाळ,उपसरपंच तुषार वाघमारे,शाळा समिती अध्यक्ष रवींद्र ढवळे,शाळा सदस्य सोमनाथ पवार,जालिंदर कौठाळे, ग्रामपंचायत सदस्य नंदकुमार ओहोळ,वर्षा वाघमारे,अर्चना वाघमारे,रेश्मा कौठाळे,प्रियांका बनकर,सुवर्णा ढवळे,वसंत बनकर,दिपक कौठाळे,भाजप तालुका विद्यार्थी उपभाध्यक्ष अमोल कौठाळे आदि ग्रामस्थांनी आंदोलन चा इशारा दिला आहे.

# बनावट ॲप घोटाळ्याप्रकरणी धर्मदाय उपायुक्तांकडे तक्रार

◆ **मनेवासा (प्रतिनिधी):**

नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथील बनावट ॲपच्या माध्यमातून केलेल्या करोडो रुपयाच्या घोटाळ्याची अहिल्यानगर येथील धर्मदाय उपायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली.

शनैश्वर देवस्थान शनीशिंगणापूरमध्ये काही व्यक्तींनी बनावट ऍप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून करोडो रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे. तसेच बनावट देणगी पावती पुस्तकं व स्वतः चा बनावट QR कोड वापरून देवस्थानचा निधी स्वतःच्या खात्यात वळवून घेण्याची करामत करून दाखवली. या बनावट ऍपचे लाखो सदस्य असून सदस्यत्व फी व पूजेच्या साहित्याची वेगळीच फी लावून करोडो रुपये शनीभक्तांकडून या बनावट ऍपच्या,QR कोडच्या माध्यमातून जमा करण्यात आले परंतु हा निधी देवस्थान तिजोरीत जमा न होता तो बनावट ऍपच्या माध्यमातून खाजगी व्यक्तीच्या खात्यावर जमा झाला. ऍपच्या माध्यमातून देवस्थानची करोडोची फसवणूक करण्यात आली.ऑनलाईन पूजेच्या नावाखाली शनीभक्तांची मोठी लूट या कर्मचाऱ्यांनी केलेली दिसून येते.हा घोटाळा शंभर कोटीच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अशा ऍपसाठी धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून परवानगी घेणे आवश्यक होते.तसा ठराव विश्वस्त मंडळाकडून घेणे गरजेचे होते. तसे करार पत्र असणं गरजेचे होते.परंतु असा कुठलाही ठराव, परवानगी पत्र घेतले गेले नाही.

याविषयी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी देवस्थान प्रशासन व पोलीस अधीक्षक यांच्याकडे रीतसर चौकशीची मागणी केली होती.देवस्थानने तीन ऍपची चौकशी करण्याचे पोलीस विभागास पत्र दिले परंतु अशा प्रकारचे सात ते आठ ऍप असल्याचे समजले आहे.या सर्व ऍपची व त्यांच्या बँक ट्रांजक्शनची चौकशीची मागणी करण्यात आली आहे.तसेच बनावट पावती पुस्तकं व QR कोड माध्यमातून केलेल्या घोटाळ्याच्या चौकशीची मागणी यावेळी करण्यात आली. तर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. सदर प्रकरणाची त्वरित चौकशी करण्यात येईल त्यासाठी योग्य पावले उचलले जातील असे उपायुक्त यांनी स्पष्ट केले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, छावाचे रावसाहेब काळे, बसपाचे हरीश चक्रनारायण,संदीप मोटे,सुमित पटारे, सतीश तऱ्हाळ आदी उपस्थित होते.

## भारदे महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी संजय कुलकर्णी



◆ **शेवगांव (प्रतिनिधी):**

येथील पद्मभूषण बाळासाहेब भारदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय याच्या प्राचार्य पदी संजय राजाराम कुलकर्णी यांची पदोन्नती झाली आहे. त्यांनी भारदे साक्षरता प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रमेश भारदे ,उपसचिव हरीश भारदे यांच्या उपस्थितीत सेवानिवृत होत असलेले प्राचार्य शिवदास सरोदे यांचे कडून पदभार स्वीकारला.

प्राचार्य शिवदास सरोदे हे प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत् झाले आहेत. यावेळी त्यांनाही निरोप देण्यात आला. प्राचार्य संजय कुलकर्णी गणित विषयातील तज्ञ असून राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शनात त्यांचा हात खंडा आहे. त्यांनी परिश्रम पूर्वक तालुका घडविला आहे .त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने सुरू केलेल्या गुणवत्ता विकसन उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. यावेळी उपमुख्याध्यापक घनवट, पर्यवेक्षक उमेश घेवरीकर, भाऊसाहेब काटेकर उपस्थित होते.

## वेचक

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राहाता - शिर्डी साई सायकल परिक्रमा

**शिर्डी :** जागतिक पर्यावरण दिन व जागतिक सायकल दिनानिमित्त राहाता येथील साईयोग फाउंडेशन व गुड मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी राहाता शिर्डी साई सायकल परिक्रमा आयोजित करण्यात आली होती.सायकल परिक्रमा पहाटे सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होऊन शिर्डी येथील द्वारकामाई समोर शिर्डी माझे पंढरपूर ही आरती करून परिक्रमामार्गे विरभद्र मंदिर बन येथे दर्शन घेऊन शिवावरून राहाता येथे समारोप करण्यात आला. याप्रसंगी साईयोग फाऊंडेशनचे जेष्ठ सदस्य संजय बाबर,मनोज पिपाडा,विठ्ठल निर्मळ,सिताराम बावके,बाळासाहेब तारगे,आण्णासाहेब कांदळकर,आप्पासाहेब माळवदे,शिवाजी क्षीरसागर यांचा श्रीसाई शाल व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.द्वारकामाई समोर साईयोग फाऊंडेशनचे जेष्ठ सदस्य बाळासाहेब गाडेकर यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.गुड मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष अरुण मोकळ यांनी पर्यावरणाचे महत्व विषद करताना साईयोग फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला.ते पुढे म्हणाले साईयोग फाउंडेशन गेली ९ वर्षांपासून स्वच्छता अभियान,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन तसेच ३ वर्षांपासून इंधनामुळे होणारे हवेचे प्रदूषण कमी करण्याच्या हेतूने सायकल चालवा पर्यावरण वाचवा या मोहीम अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या गुरुवारी पहाटे राहाता शिर्डी साई सायकल परिक्रमा अविरत चालू ठेवून निसर्गाप्रती आपली सेवा प्रदान करीत आहे.ही बाब अनुकरणीयच नव्हे तर भूषणावह आहे. याप्रसंगी साईयोग फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ बापूसाहेब पानगव्हाणे,ॲड गोरखनाथ दंडवते,मोहन तांबे,विलास वाळेकर, भाऊसाहेब बनकर,भरत दवंगे,सुनील परदेशी, बाळासाहेब गाडेकर,मनोज पिपाडा,संजय बाबर,बबलू फटांगरे,अरुण मोकळ,परमेश चव्हाण,अनिल पवार, प्रकाश पुंड,संजय वाघमारे,विठ्ठल निर्मळ,सिताराम बावके,दिपक दंडवते,प्रविण खंडीझोड,सुभाष दंडवते, उमेश लुटे, भागवत वाघमारे,सागर माळवे,कुमारी साईशा परमेश चव्हाण,अर्जुन परमेश चव्हाण,ज्ञानेश्वर खापटे,गणेश रोहोम,विजय निरगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अभिनेते मकरंद अनासपुरे सपत्नीक शनिचरणी नतमस्तक



◆ **नेवासा (प्रतिनिधी):**

मराठी चित्रपट सुष्टीतील प्रसिद्ध विनोदी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथे शनिदेवाचा अभिषेक घालून सपत्नीक शनीदेवाचे दर्शन घेतले

यावेळी शनिशिंगणापूर येथील दर्शन प्रसंगी त्यांच्या समवेत त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शिल्पा अनासपुरे, चिरंजीव केशव अनासपुरे,मुलगी इंद्रायणी नेवासा तालुक्यातील आदर्श गाव गोगलगावचे माजी सरपंच योगेश म्हस्के,डॉ.आरले,अनिल वाघ,निलेश टेमक,राजू फोके उपस्थित होते. शनिवारी आलेली भागवत एकादशी यादिवशी दर्शनाचे भाग्य मला लाभले,शनिदेवाला घातलेल्या अभिषेकाने व दर्शनाने आत्मिक समाधान व एक ऊर्जा प्राप्त झाली असल्याचे अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी दर्शन झाल्यानंतर सांगितले. यावेळी श्री शनैश्वर देवस्थानच्या वतीने अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा श्रीफळ प्रसाद व शनिदेवाची शाल देऊन सन्मान करण्यात आला.

जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे या जोडीने नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून उपेक्षित घटकाला न्याय देऊन पुण्याचे कार्य हाती घेतले असून त्यांच्या या कार्याला बळ मिळावे असे साकडे युवा नेते योगेश म्हस्के यांनी दर्शन प्रसंगी शनीदेवाला घातले

## पठारच्या मोरवाडी धरणाबाबत बुधवारी मंत्रालयात बैठक : आ. खताळ

◆ **संगमनेर (प्रतिनिधी):**

यापूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी तालुक्या तील पठार भागातील जनतेला गेली ४० वर्षापासून पाण्यापासून वंचित ठेवले आहे. या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मोरवाडी येथे धरण व्हावे अशी या साकुर पठार भागातील जनतेची अनेक वर्षाची मागणी होती. या मागणीचा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गांभीर्याने दखल घेतली असून पुढील आठवड्यात बुधवारी मुंबई येथील मंत्रालयामध्ये मंत्री विखे यांच्या प्रमुख उपस्थिती मोरवाडी धरणाच्या संदर्भात जलसंपदा विभागाची महत्त्वपूर्ण बैठक बोलावली असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.

संगमनेर तालुक्यातील वरवंडी येथील दत्त मंदिरात येथील युवक कार्यकर्ते दत्तात्रेय वर्पे, राज पाटोळे आणि समस्त ग्रामस्थ वरवंडी यांच्या वतीने आमदार खताळ यांची पेढे तुला करण्यात आली.

यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. ते पुढे म्हणाले, संगमनेर तालुक्यातील साकूर पठार भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी मुळा नदीवर मोरवाडी धरण व्हावे अशी या भागातील जनतेची अनेक वर्षांची जुनी मागणी आहे हे धरण होण्यासाठी जागाही संपादित करण्यात आली होती. मात्र नंतर हे ठिकाण मागे पडून याच नदीवर पुढे राहुरी तालुक्यातील मुळा धरण बांधण्यात आले. सध्या मुळा नदीवर आंबीत व पिंपळगाव खांड ही दोन धरणे आहेत. त्यापैकी पिंपळगाव खांड धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये साकूर पठारभागातील गावांचा समावेश नसल्याने ही गावे अनेक वर्ष पाण्यापासून वंचित राहिली आहेत. तसेच या धरणाच्या लाभ क्षेत्रात या पठार भागाचा समावेश व्हावा यासाठी अकोले तालुक्यातील अनेक गावांचा विरोध आहे. त्यामुळे पठार भागासाठी मोरवाडी हे स्वतंत्र धरण व्हावे अशी या भागातील नागरिकांची इच्छा आहे. त्यानुसार जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या भागाचा सर्वे करण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार सर्वे झाला आहे.आणि पुढील आठवड्यात बुधवारी या मोरवाडी धरणाच्या संदर्भात मुंबईला मंत्रालयात जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या समवेत शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे ,भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजपा राज्य कार्यकारिणी सदस्य रऊफ शेख, खांबा गावचे सरपंच रवींद्र दातीर, ज्येष्ठ नेते बाबासाहेब कुटे, माजी सरपंच बाबाजी सागर ,ॲड. अमित धुळगंड, भाजप ज्येष्ठ नेते दादा भाऊ गुंजाळ ,आर पी आय तालुका अध्यक्ष आशिष शेळके ,ऋषीराज बाबा परांडेकर ,विद्याताई महाराज बानकर ,पुरुषोत्तम महाराज पेटकर, गणेश डोंगरे, भागवत बस्ते, डॉ. संतोष वर्पे, बाजीराव पाटोळे ,राजाबापू वर्पे, उल्हास गागरे, एकनाथ वर्पे संपत भोसले, तुळशीराम पाटोळे, सुभाष पाटोळे यांच्यासह साकुर पठार भागातील मान्यवर व वरवंडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कार्यकर्त्यांच्या केसालाही धक्का लावला, तर गाठ माझ्याशी - आ. खताळ

विधानसभा निवडणुकीच्या वेळी अनेकांनी तुमच्यावर दहशत दादागिरी करून तुम्हाला सोशल मीडियाच्या माध्यमातून धमकविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याकडे दुर्लक्ष करा. परंतु ते आती करत असेल तर मला सांगा मी त्यांचा नक्कीच बंदोबस्त करेल. माजी आमदारांच्या बगलबच्चांचा आपण बंदोबस्त केला आहे .जे काही थोडे फार राहिले आहेत. त्यांचा सुद्धा बंदोबस्त केला जाईल, परंतु माझ्या कार्यकर्त्यांच्या केसालाही धक्का लावला तर गाठ माझ्याशी आहे असा इशारा आमदार अमोल खताळ यांनी यावेळी दिला.

## साई संस्थान दानाच्या मोजदाद प्रकरणातील आरोपीस अटक

◆ **शिर्डी (प्रतिनिधी):**

### तीन दिवसांची पोलीस कोठडी

साईबाबा संस्थान मधील लेख विभागात कार्यरत असलेल्या शिपाई बाळासाहेब गोंदकर याने दक्षिणा पेटीतून लाखो रुपयाची रोकड चोरल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये निष्पन्न झाल्यानंतर साई संस्थानने गोंदकर यांच्याविरुद्ध काही दिवसांपूर्वी गुन्हा दाखल केला होता.गुन्हा दाखल झाल्यानंतर सदर गुन्ह्यातील आरोपी फरार झाला होता.या प्रकरणात आरोपीला अटकपूर्व जामीन मिळत नसल्यामुळे अखेर ६ जून रोजी आरोपी स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाल्याने राहाता न्यायालयाने आरोपीला तीन दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे.या प्रकरणात आणखीन एक व्यक्ती सामील असल्याची चर्चा आहे.

साईबाबा संस्थान मधील लेखा विभागात कार्यरत असलेल्या बाळासाहेब गोंदकर या शिपायाने एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या दक्षिणा मोजणीच्या वेळी पैशाची चोरी केलीची घटनेची कुदबुज शिर्डीत सुरू झाल्यानंतर साई संस्थांनी या प्रकरणाची दखल घेऊन सीसीटीव्ही फुटेज तपासणी त्यावेळी या शिपायाने ४,८ व १२ एप्रिल रोजी दक्षिणा मोजणी दरम्यान ५०० रुपयांच्या नोटाचे बंडल चतुराईने लपवले आणि नंतर ते चोरून नेले ही चोरी झालेली रक्कम अंदाजे दीड लाख रुपये दरम्यान असल्याची चर्चा आहे.सीसीटीव्ही फुटेज मध्ये साई संस्थान लेखा शाखेचा शिपाई बाळासाहेब गोंदकर याने नोटाचा बंडल मांडीखाली, पॅन्ट मध्ये आणि मशीनच्या मागे लपून नंतर घेऊन गेलेल्याचे स्पष्ट दिसत असल्याने संस्थांचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या आदेशानुसार लेखा शाखेचे अविनाश कुलकर्णी यांनी गोंदकर यांच्या विरोधात शिर्डी पोलिसात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी घटनेचा तपास केल्यानंतर बाळासाहेब गोंदकर यांच्या विरोधात गुन्हा केला होता.गुन्हा दाखल झाल्यानंतर संस्थान प्रशासनाने गोंदकर यावर बडतर्फची कारवाई केली होती.गुन्हा दाखल झाल्यापासून शिर्डी पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे हे या गुन्ह्यतील आरोपीचा शोध घेत होते.या प्रकरणातील आरोपी गोंदकर याने अटकपूर्व जामीन मिळण्याचा प्रयत्न केला परंतु न्यायालयाने तो फेटाळल्याने शुक्रवारी ६ जून रोजी बाळासाहेब गोंदकर हा स्वतःहून शिर्डी पोलिस ठाण्यात हजर झाला पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन राहाता न्यायालयात हजर केले.राहाता न्यायालयाने या आरोपीला तीन दिवस पोलीस कोठडी सुनावली असण्याची माहिती पोलीस निरीक्षक रंजीत गांधी यांनी दिली आहे.दक्षिणा मोजणी प्रकरणात आणखीन एक व्यक्तीचा समावेश असल्याची चर्चा शिर्डीत सुरू असून सीसीटीव्ही फुटेजची बारीक तपासणी केल्यानंतरच या प्रकरणात आणखीन कोण सामील आहे हे सिद्ध होईल.

## वरूर ते पंढरपूर स्वतंत्र एसटी बसद्वारे ग्रामस्थांची तपपूर्ती



◆ **शेवगाव (प्रतिनिधी):**

गेल्या वर्षभरामध्ये वरूर ते पंढरपूर स्वतंत्र एसटी बस द्वारे गावातील ग्रामस्थांनी दर महिन्याच्या शुद्ध एकादशीला एक वारी याप्रमाणे १२ महिने वारीचे एक तप पूर्ण केले.यासाठी शेवगाव आगाराचे विशेष सहकार्य लाभले.त्याप्रित्यर्थ तालुक्यातील धाकटी पंढरी म्हणून लौकिक असलेल्या श्री क्षेत्र वरूर येथील ग्रामस्थांच्या वतीने शेवगाव एसटी आगारातील पदाधिकाऱ्यांचा नुकताच सन्मान करण्यात आला.

शेवगाव आगाराचे स्थानक प्रमुख शिंदे,वाहतूक नियंत्रक प्रकाश खेडकर,राजेंद्र देवढे,वरिष्ट लिपिक आदिनाथ लटपटे,यांना निमत्रित करून यांचा ग्रामस्थांच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

यावेळी नियमित पंढरपूर वारी व नर्मदा परिक्रमा करणाऱ्या सेवेकरी महिलांचा विशेष सन्मान संपन्न झाला.वर्षभरातील वारीच्या यशस्वी नियोजनासाठी अश्रू आप्पा चितळे, नाना गुरुजी वावरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुकुंद महाराज अंचवले, कुंडलिक महाराज लव्हाट, माजी सरपंच विष्णू तात्या म्हस्के, माणिकराव म्हस्के, अशोक खांबट, मुरलीधर म्हस्के, सरपंच सचिन म्हस्के, भानुदास सोनटक्के, अशोक डांगरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## निवडणूक प्रक्रियेविरोधातील विधान म्हणजे मतदारांचा अपमान : मंत्री विखे

◆ **लोणी (प्रतिनिधी):**

काँग्रेस नेते राहूल गांधी यांचा सर्वाधिक वेळ परदेशात जात असल्याने, देशातील राजकीय परीस्थीती समजून घ्यायला त्यांना वेळ लागेल असा टोला जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला.



निवडणुक प्रक्रीये विरोधातील त्यांची विधान म्हणजे मतदारांचा अपमान असल्याची प्रतिक्रीया माध्यमांशी बोलताना त्यांनी व्यक्त केली.

काँग्रेस नेते राहूल गांधी यांच्या विधानाचा समाचार घेताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,केवळ निवडणूक प्रक्रीयेला बदनाम करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मागील दोन लोकसभा निवडणुकीत कॉगेस पक्ष जेमतेत चाळीस जागांपर्यत मजल मारू शकला होता. यंदा चाळीसच्या शंभर झाल्या मग ते फिक्सिंग होत का? आंध्र आणि हिमाचल राज्यात तुमच्या पक्षाचे सरकार आले ते सुध्दा फिक्सिंगमुळे आले का या प्रश्नांची उतर सुध्दा राहूल गांधीनी दिली पाहीजेत.निवडणूक प्रक्रीये विरोधात विधान करून राहूल गांधी स्वतःची बदनामी करून घेत आहेत.लोकसभेची निवडणूक खोटे नॅरेटिव्ह पसरवून केली गेली.काही ठिकाणी त्याचा परीणाम पाहायला मिळाला.विधानसभा निवडणुकीची राजकीय परीस्थीती मात्र वेगळी होती.महायुतीला राज्यातील मतदारांनी कौल दिला.मात्र मतदारांचा सातत्याने अपमान करण्याचे काम राहूल गांधी यांच्याकडून होत आहे.त्यांनी देशात वेळ दिला तर,राजकीय परीस्थीतीची माहीती होईल.उध्दव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत आणि खा.सुप्रिया सुळे यांनी राहूल गांधीच्या वक्तव्याच्या केलेल्या समर्थनाची खिल्ली उडवून,विखे पाटील म्हणाले की,त्यांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरेल.खा.सुप्रिया सुळे यांना स्वताचे कोणतेच मत राहीलेले नाही.

लोकसभेत मांडण्यात आलेल्या विधेयकाला ते कधी पाठिंबा देतात,कधी चर्चेच्या वेळी गैरहजर राहाता.त्यांचे पिताश्री मोदींचे कौतुक करतात याकडे लक्ष वेधून त्यांनी खरच एकदा निर्णय घेतला पाहीजे की,आघाडीसोबत राहायचे की मोदींच्या बरोबर काम करायचे.त्यांच्या पक्षातील लोकांचा सुध्दा त्यांच्यावर विश्वास राहीलेला नाही.उध्दव आणि राज ठाकरे यांच्या एकत्रित येण्याच्या मुद्द्यावर भाष्य करताना मंत्री विखे म्हणाले की,महाराष्ट्रातील जनतेच्या मनात फक्त महायुती आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही तेच चित्र पाहायला मिळेल,निवडणुका महायुती म्हणूनच आम्ही लढणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

## छ. शिवाजी महाराज पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष होते : प्रा. कासार

◆ **अकोले (प्रतिनिधी) :**

छत्रपती शिवाजी महाराजांची आपल्या सैन्याला आज्ञा होती,"स्वराज्यातील आंबे, फणस हेही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची,परंतु त्यांस हात लावू देऊ नये. काय म्हणून तर ही झाडे वर्षा - दोन वर्षांत होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लावून लेकरांसारखी बहुत काळ जतन करून वाढवली.त्यांचे दुःखास पारावार काय? कदाचित एखादे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असले, तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषे तोडून द्यावे." महाराजांच्या या आज्ञेतून महाराजांना रयतेची,रयतेच्या संपत्तीची असलेली काळजी दिसतेच.परंतु ते पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष असल्याचेही लक्षात येते,' असे प्रतिपादन प्रा.संदेश कासार यांनी केले.



येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे आयोजित 'शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम' प्रसंगी पर्यावरण संतुलन या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ॲड.मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती मनिषा वर्मा (भा. प्र.से.) यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमाला सदिच्छा दिल्या. अध्यक्षस्थानी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर हे होते तर सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मंचावर परफेक्ट इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या सौ. मीना नवले,औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अरुण भालेराव हे उपस्थित होते.पुढे बोलताना प्रा. कासार म्हणाले,' मे महिन्यामध्ये अभूतपूर्व पाऊस महाराष्ट्राने अनुभवला.हा मॉन्सूनपूर्व पाऊस होता.अरबी समुद्र व बंगालचा उपसागर याठिकाणी तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हा भयावह पाऊस पडला. शेतीचे, संपत्तीचे मोठे नुकसान या पावसाने झालेच परंतु जीवितहानीही मोठ्या प्रमाणावर झाली. हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांचे एक उदाहरण म्हणजे हा पाऊस होय.पर्यावरण ऱ्हासाची विविध कारणे,त्याचे दुष्परिणाम विविध उदाहरणांनी त्यांनी समजावून सांगितले. पर्यावरण संरक्षण व संवर्धन चळवळी, वैज्ञानिक पातळीवर सुरू असणारे पर्यावरण संवर्धनासाठीचे प्रयत्न यांची माहिती दिली.पर्यावरण संवर्धनामध्ये आपण कोणती भूमिका पार पाडू शकतो याविषयी त्यांनी विवेचन केले.अध्यक्ष सुनील दातीर यांनी अध्यक्षीय मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची महती सांगितली. शिवराज्याभिषेक सोहळ्याचा गौरवशाली इतिहास त्यांनी कथन केला. 'परफेक्ट' च्या प्राचार्या सौ.मीना नवले यांनीही प्रदूषणाचे विविध प्रकार, प्रदूषणाचे आपल्या जीवनावर होणारे दुष्परिणाम व प्रदूषण कमी करण्यासाठी आपली भूमिका यावर मनोगत व्यक्त केले.यावेळी हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.आय.टी. आय.प्रवेशासाठी तयार करण्यात आलेला व्हिडिओही याप्रसंगी दाखविण्यात आला.दोन नाविन्यपूर्ण उपक्रमांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. आर.के.आरोटे सर यांनी सूत्रसंचलन केले व आभार हासे सर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बी.जे.वैद्य,पी. बी.नवले एन. जी. थटार,सागर मंडलिक, सतीश वैद्य,भारत धुमाळ यांनी विशेष परिश्रम घेतले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गावोगावी असणाऱ्या बस थांब्यांची पुनर्बांधणी करा : विवेक कोल्हे

◆ **कोपरगाव (प्रतिनिधी):**

मतदारसंघात सध्या विविध गावांमध्ये अंतर्गत रस्त्यांचे शासकीय स्तरावर काम सुरू असून, या रस्त्यांच्या कामांच्या दरम्यान अनेक ठिकाणी शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या बस थांब्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

काही ठिकाणी हे बस थांबे हटवून टाकण्यात आले असून, काही ठिकाणी ते अर्धवट अवस्थेत उध्वस्त झालेले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेचे संचालक युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी जिल्हाधिकारी डॉ .पंकज आशिया यांच्याकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार, संबंधित ग्रामपंचायती आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी



रस्ता पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावांमध्ये आधीप्रमाणेच बस थांबे पुन्हा उभारणे व ज्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे ते करून घेणे बंधनकारक असावे, असे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने त्वरित काढावेत, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

विवेकभैय्या कोल्हे यांनी स्पष्ट केले की, बस थांबे हे फक्त वाहतूक व्यवस्थेचा भाग नसून नागरिक आणि विशेषतः विद्यार्थीवर्गासाठी निवारा देणारे ठिकाणही आहे. बस येईपर्यंत थांबण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नसेल तर प्रवाशांना उन्हा-पावसात उभे राहावे लागते, जे आरोग्यास हानीकारक ठरते.

कोपरगाव मतदारसंघातील अनेक गावांमध्ये हे चित्र दिसून येत असून, नागरिकांकडूनही याबद्दल प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तत्काळ या समस्येची गंभीर दखल घ्यावी व संबंधित यंत्रणांना योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी ठाम भूमिका कोल्हे यांनी मांडली. शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेले बस थांबे म्हणजे जनतेची संपत्ती असून, त्यांचे जतन करणे संबंधित यंत्रणेचे कर्तव्य आहे. असे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.